विधानसभा आश्वासन समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

दहावा अहवाल

(सन २०१४ च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल)

(दिनांक नोव्हेंबर, २०१८ रोजी विधानसभेस सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१८

महाराष्ट्र विधानसभा

आश्वासन समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

दहावा अहवाल

(सन २०१४ च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल)

विधानसभा आश्वासन समिती
(२०१७-२०१८)

समिती प्रमुख		
१.	श्री.जयप्रकाश मुंदडा, वि.स.स तथा समिती प्रमुख	
सदस्य		
२.	श्री.हरिभाऊ जावळे, वि.स.स.	
३.	श्री. तानाजी मुटकुळे, वि.स.स.	
४.	श्री. सुरेश भोळे, वि.स.स.	
५.	श्री. विनायकराव जाधव-पाटील, वि.स.स.	
६.	श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.	
७.	श्री. प्रकाश फातर्पेकर, वि.स.स.	
८.	श्री. नागेश पाटील-आष्टीकर, वि.स.स.	
९.	श्री. चंद्रदीप नरके, वि.स.स.	
१०.	श्री. काशिराम पावरा, वि.स.स.	
११.	श्री. डी. पी. सावंत, वि.स.स	
१२.	श्री. जयकुमार गोरे, वि.स.स.	
१३.	श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.	
१४.	श्री. भास्कर जाधव, वि.स.स.	
१५.	श्री. संजय कदम, वि.स.स.	
१६.	श्री. महेश लांडगे, वि.स.स.	
१७.	श्री. रवि राणा, वि.स.स.	
१८.	श्री. गणपत गायकवाड, वि.स.स.	
१९.	श्री.क्षितीज ठाकूर, वि.स.स.	

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री.राजेश तारवी, उप सचिव,

(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,

(४) श्रीमती नंदिनी सावंत, कक्ष अधिकारी.

अनुकमणिका

अनुक्रमांक (१)	विषय (२)			पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना :	..	..	
१.	विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या	..	..	
२.	विवरणपत्रे विधानसभेस सादर होण्यास झालेला विलंब	..	..	
३.	सन १९९१ पासून ते जुलै, २०१८ अखेरपर्यंत वर्षनिहाय व विभागनिहाय आश्वासनांची प्रलंबित यादी.			
४.	अभिप्राय व शिफारशी	..	..	
	परिशिष्टे :	..	..	
	परिशिष्ट-एक - आश्वासनांवर विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती	..	..	
	परिशिष्ट-दोन -आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रके	..	..	
	परिशिष्ट-तीन - आश्वासनांवरील कार्यवाहीचे नमुना विवरण	..	..	
	परिशिष्ट-चार- समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त	..	..	

प्रस्तावना

मी, विधानसभा आश्वासन समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन तिच्या वतीने समितीचा **दहावा** अहवाल सभागृहास सादर करीत आहे. सन २०१४ च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनात विधानसभेत शासनातर्फे देण्यात आलेली काही प्रलंबित आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही यासंदर्भात विभागांकडून प्राप्त झालेल्या विवरणपत्रांची समितीने केलेली छाननी यासंबंधीचा समितीचा हा अहवाल आहे.

सन २०१४ च्या **चौथ्या (हिवाळी)** अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून विधान सभागृहात देण्यात आलेल्या काही प्रलंबित आश्वासनांच्यासंदर्भात आश्वासन समितीचा सदरहू **दहावा** अहवाल तयार करण्यात आला आहे.

आश्वासनांबाबत विभागाने केलेली कार्यवाही परिशिष्ट "एक" मध्ये देण्यात आली असून आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/ परिपत्रके परिशिष्ट "दोन" मध्ये देण्यात आले आहेत. तसेच आश्वासनांबाबतची माहिती सादर करण्याबाबतचे नमुना विवरणपत्र परिशिष्ट "तीन" मध्ये देण्यात आली आहे व समितीच्या बैठकांची संक्षिप्त माहिती परिशिष्ट "चार" मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

समितीने सदरहू अहवालावर दिनांक नोव्हेंबर, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत विचार करुन तो संमत केला.

विधान भवन, मुंबई, दिनांक : नोव्हेंबर, २०१८.	, समिती प्रमुख, विधानसभा आश्वासन समिती

सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या

अहवाल

सन २०१४ च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनात शासनाने दिलेल्या आश्वासनांपैकी **प्रलंबित ८२२** आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी खाली दर्शविलेल्या दिनांकास विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली.

सन २०१४ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीबाबत पटलावर ठेवलेल्या विवरणपत्रांचे दिनांकनिहाय क्रमांक व संख्या,

अ.क्र.	आश्वासन पटलावर ठेवल्याचा दिनांक	आश्वासन क्रमांक	आश्वासन संख्या
१)	दिनांक ७ एप्रिल, २०१५	६९, १७२	२
२)	दिनांक २१ जुलै, २०१५	३, १३, १५, १६, २०, २१, ३२, ३३, ३४, ४१, ६२, ७८, ७९, १००, १०५, १०७, ११७, ११८, १२२, १३०, १३१, १३६, १३७, १३८, १४३, १४६, १४९, १५७, १७१, १७५, १७६, १७७, १७८, १७९, १८०, १९९, २१३, २१५, २१६, २१८, २१९, २२२, २२८, २२९, २३०, २३१, २३५, २३६, २३७, २३८, २३९, २४२, २४३, २४५, २८१, २८२, २९९, ३००, ३०१, ३०२, ३४४, ३६१, ३६३, ३६४, ३६५, ३६६, ३६७, ३९१, ३९२, ३९७, ३९८, ३९९, ४१९, ४२०, ४२३, ४२४, ४४९, ४६६, ४६७, ४६८, ४७८, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ५२८, ५३८, ५३९, ५४६, ५४७, ५४८, ५४९, ५५१, ५५७, ५७८, ५८५, ६०२, ६०३, ६०४, ६११, ६१२, ६१३, ६१४, ६२१, ६३२, ६५८, ६५९, ६७९, ६८०, ६८९, ६९१, ६९४, ७३५, ७४२, ७४५, ७४६, ८१६, ८१८, ८२०, ८२१, ८२२	१२१
३)	दिनांक १४ डिसेंबर, २०१५	१, ४, ५, २३, ४२, ४५, ५५, ५६, ७३, ८१, ८२, ९५, ९६, ९७, ९८, ९९, १०१, १०२, १०४, १०६, १०८, १०९, १२८, १२९, १३२, १३३, १३४, १३९, १४०, १४५, १४७, १५०, १५८, १६०, १६१, १६२, १८२, २००, २०१, २०२, २०३, २०९, २२३, २२७, २३२, २३४, २४१, २४४, २४६, २४७, २६४, २६५, २८३, २८६, ३२२, ३२३, ३२९, ३४६, ३५६, ३५८, ३७०, ३९५, ३९६, ४४४, ४८७, ४९६, ४९७, ४९८, ५०३, ५०४, ५०५, ५०६, ५०७, ५०८, ५०९, ५१०, ५११, ५१३, ५१४, ५१५, ५२०, ५२५, ५२९, ५५८, ५५९, ५६०, ५६५, ५७१, ५९८, ६००, ६०५, ६०६, ६०७, ६०८, ६०९, ६१०, ६२२, ६३८, ६३९, ६४०, ६४६, ६५२, ६५३, ६५४, ६५६, ६६१, ६७४, ६७५, ६७६, ६७७, ६७८, ६८४, ६९६, ६९७, ७१३, ७१४, ७१५, ७१६, ७१७, ७२१, ७२६, ७३०, ७३१, ७३२, ७३३, ७५२, ७५६, ७५७, ७८८, ७८९, ८००, ८०२, ८०३, ८०६, ८०७, ८०८, ८०९, ८१७, ८१९	१३९
४)	दिनांक २८ मार्च, २०१६	८, ९, १०, ११, १२, १९, ४३, ४४, ७५, ११५, ११९, १२५, १२६, १५२, १८७, १९७, २०७, २३३, २५८, २६३, २७२, २८७, २९२, २९५, ३४५, ३४८, ३६०, ३६८, ३७८, ३९४, ४००, ४१८, ४२२, ४३७, ४३८, ४३९,	७६

		४४०, ४७७, ५४२, ५४३, ५५५, ५६३, ६२३, ६२४, ६२५, ६२६, ६२७, ६२८, ६२९, ६३०, ६३१, ६३७, ६४७, ६४८, ६५१, ६६३, ६६४, ६६५, ६६६, ६६७, ६६८, ६६९, ६८१, ७०९, ७२९, ७३७, ७३९, ७४०, ७४१, ७५३, ७७५, ७८४, ७८५, ८१०, ८११, ८१२	
५)	दिनांक २६ जुलै, २०१६	२, ७, ५९, ६०, ११०, १११, १६८, १८१, १८३, २०४, २०५, २२६, २५०, २५५, २५७, २६६, २९०, २९३, २९४, २९७, २९८, ३०८, ३११, ३५७, ५१२, ५६४, ६३३, ६३५, ६४१, ६४२, ६४३, ६४४, ६९२, ७१०, ७६३, ७६४, ७६५, ७६६, ७६७, ७६८, ७६९, ७७०, ७७१, ७९१,	४४
६)	दिनांक ७ डिसेंबर, २०१६	२१०, २११, २७८, ३७१, ३८४, ३८५, ३८६, ३८८, ३९३, ४६१, ४६४, ४८९, ७११, ७२७, ७४७, ७४८, ७४९, ७५०, ७५१, ७५४	२०
७)	१० मार्च, २०१७	११२, ३७७, ५४४	३
८)	२८ जुलै, २०१७	२५९, ३५९	२
९)	१४ डिसेंबर, २०१७	१९८	१
१०)	१९ मार्च, २०१८	१४	१
११)	१२ जुलै, २०१८	६७२, ६७३	२
		• **<u>विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी एकूण प्रलंबित आश्वासने -</u>** ६, २४, ६८, ७०, ७२, ८३, ८४, ८५, ८६, ८७, ८८, ८९, ११६, १६६, १६७, १६९, १७३, १७४, १८४, १८५, १८६, १९२, १९३, १९४, १९५, १९६, २२५, २४०, २५६, २८८, २८९, ३०५, ३०९, ३१५, ३१७, ३१९, ३२५, ३२६, ३२७, ३२८, ३३०, ३५२, ४६९, ४७०, ४७१, ४७२, ४७३, ४७५, ४७६, ४७९, ५००, ५२२, ५४०, ५४१, ५६८, ६०१, ६१५, ६१८, ६१९, ६३६, ६४५, ६४९, ६५०, ६८५, ६८८, ६९८, ६९९, ७००, ७०१, ७०२, ७०३, ७२३, ७२४, ७३४, ७३६, ७३८, ७४३, ७५८, ७६०, ७९०, ७९३ **पटलावर ठेवलेली परंतु समितीच्या विचार विनिमयासाठी (वाचनासाठी) प्रलंबित असलेली आश्वासने** १७, १८, २५, ३५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५८, ६१, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ७१, ७६, २०६, २०८, २१४, २१७, २२०, २४८, २६१, २६२, २७५, २७७, २८०, २८४, ३२१, ३२४, ३३१, ३३२, ३४१, ३४३, ३५०, ३५३, ३५४, ३७२, ३७६, ३७९, ३८१, ३८२, ३८३, ४०३, ४०४, ४१०, ४११, ४१२, ४१७, ४२५, ४२६, ४२७, ४२८, ४२९, ४३०, ४३१, ४३२, ४३३, ४३४, ४३५, ४३६, ४४१, ४४२, ४४३, ४४५, ४४८, ४५२, ४८२, ५०१, ५१६, ५१७, ५१८, ५१९, ५२१, ५२४, ५५४, ५५६, ५६१, ५६२, ५६६, ५६७, ५८०, ५८१, ५८२, ५८३, ५८४, ५८९, ५९०, ५९१, ५९५, ५९६, ६३४, ६६०, ६७०, ६७१, ६८२, ६९५, ७०४, ७०५, ७०६, ७०७, ७०८, ७१२, ७४४, ७७६, ७७७, ७७८, ७७९, ७८१, ७८२, ७८३, ७९७, ७९८, ८०१, ८०४, ८०५, ८१४, ८१५ • **गृहनिर्माण विभागाचे वगळावयाचे प्रकरण क्रमाक- ७१८**	८१ 119

			१
		एकूण	**६१२**

विवरणपत्रे सादर होण्यास झालेला विलंब.

सन २०१४ च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून देण्यात आलेल्या एकूण ८२२ आश्वासनांपैकी मा.संसदीय कार्य मंत्री यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या कार्यवाहीच्या विवरणपत्राची दिनांक निहाय संख्या विचारात घेता असे दिसून येते की, साधारणत: २ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ६ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, ११० आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ३ महिने २० दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, १३३ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ८ महिने १३ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, ७२ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ११ महिने २५ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, ३३ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष ३ महिने २५ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, १९ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष ८ महिने ६ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, ३ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष ११ महिने ९ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे २ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी २ वर्ष ३ महिने २७ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, १ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी २ वर्ष ८ महिने १३ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, १ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी २ वर्ष ११ महिने १८ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे. अद्याप २१० आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे प्रलंबित आहेत. या प्रलंबित आश्वासनांची सविस्तर माहिती देणारे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

प्रलंबित आश्वासनांची विभागनिहाय यादी

अ.क्र. (१)	विभागाचे नांव (२)	आश्वासन क्रमांक (३).	आश्वासनांची एकूण संख्या. (४)
१.	महसूल व वन विभाग	३६, ३७, ३८, ३९, ४०, ५१, ५२, ५३, ५४, २२४, २७३, २७४, २७६, २७९, ३६२, ३६९, ४१३, ४१४, ४१५, ४१६, ६६२, ७९४, ७९५, ७९६, ७९९,	२५
२.	उद्योग ऊर्जा व कामगार विभाग.	१३५, १४१, १४२, १४४, १५९, ४५३, ४५४, ४५५, ४५६, ४५७, ५५०, ५५२, ५५३, ५८६, ५८७, ५८८, ५९२, ५९३, ५९४,	१९
३.	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	१५४, १५५, १५६, १६५, ३४७, ३४९, ३५१, ५६९, ६१६, ६१७, ६२०,	११
४.	शालेय शिक्षण व क्रिडा विभाग.	८०, ९०, ९१, ९२, ९३, ९४, १०३, ३१२, ३१३, ३१४, ३१६, ३१८, ४८०, ४८१, ४८३, ४८४, ४८५, ४८६, ४८८, ४८९, ४९०, ४९१, ५०२, ५३०, ५३१, ५३२, ५३३, ५३४, ५३५, ५३६, ५३७,	३१

५.	उच्च व तंत्रशिक्षण विभाग	४९९	१
६.	नगरविकास विभाग	२२, २६, २७, २८, २९, ३०, ३१, २१२, ३२०, ३५५, ४५८, ४५९, ५९७, ५९९, ७७२, ७७३, ७७४, ७८०, ७८६, ७८७, ७९२,	२१
७.	गृह विभाग	११३, ११४, १२०, १२१, १२३, १२४, १२७, १५१, १५३, २९१, २९६, ४६०, ४६२, ४६३, ४६५, ४७४, ५७२, ५७३, ५७४, ५७५, ५७६, ५७७, ५७९, ६५७, ६८६, ६८७, ६९०, ६९३, ७५९, ७६१, ७६२,	३१
८.	सार्वजनिक बांधकाम विभाग	१८८, १८९, १९०, १९१,	४
११	कृषी व पदुम विभाग	७४, ४४६, ४४७, ४५०, ४५१, ५४५,	६
१२.	ग्रामविकास व जलसंधारण विभाग	२६०, २६७, २६८, २६९, २७०, २७१, ३७३, ३७४, ३७५, ३८०, ३८७, ३८९, ३९०, ४२१, ७२५, ७२८, ७५५,	१७
१५.	वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग	५२३, ५२६, ५२७,	३
	सार्वजनिक आरोग्य विभाग	२४९, २५१, २५२, २५३, २५४, ३३३, ३३४, ३३५, ३३६, ३३७, ३३८, ३३९, ३४०, ३४२, ४०१, ४०२, ४०५, ४०६, ४०७, ४०८, ४०९,	२१
१७.	सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग	५७, ७७, १४८, १७०, ७२२,	५
१८.	नियोजन विभाग	२८५, ६५५,	२
१९.	पर्यावरण विभाग	६८३,	१
२०.	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग	१६३, १६४, ३०३, ३०४, ३०६, ३०७, ३१०,	७
२१.	जलसंपदा विभाग	२२१,	१
२२.	वित्त विभाग	५७०,	१
२३.	गृहनिर्माण विभाग	७१९, ७२०, ८१३	३
		एकूण	**२१०**

उपरोक्त आश्वासनांबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही/अंतरिम माहिती देखील, संबधित विभागांनी समितीला पुरविलेली नाही. याबाबत समिती नापसंती व्यक्त करीत आहे. याबाबत विभागाने वेळीच कार्यवाही केली असती तर ही आश्वासने प्रलंबित राहिली नसती असे समितीला वाटते. आता तरी विभागाने या प्रकरणी गंभीर दखल घेऊन प्रलंबित असलेल्या आश्वासनांबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर लवकरात लवकर ठेवण्याची व्यवस्था करावी. या आश्वासनांबाबत शासनातर्फे करण्यात आलेल्या **" कार्यवाहीचे विवरण"** जरी सादर करण्यात आलेले नसले तरी या आश्वासनांच्या क्रमांकानुसार करण्यात आलेल्या नोंदी सभागृहाच्या माहितीसाठी अहवालामध्ये अंर्तभूत करण्याचे समितीने ठरविले आहे. **"कार्यवाहीचे विवरणपत्र**

तात्काळ सादर करण्यात यावे" असे त्या ठिकाणी नमूद करण्यात आले आहे. एक महिन्याच्या आत असे विवरणपत्र सादर करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय - शिफारशी

विधानसभा सभागृहात मा.सदस्यांद्वारे विविध संसदीय आयुधांद्वारे उपस्थित करण्यात आलेल्या बाबींवरील चर्चेला उत्तर देत असताना मा.मंत्री महोदयांकडून आश्वासने, अभिवचने दिली जातात. सभागृहात दिलेल्या सदर आश्वासनांची पूर्तता शासनाने ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे. तथापि, बहुतेक प्रकरणात आश्वासनाच्या पूर्ततेसाठी सदर विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागत असल्याची बाब समितीने आपल्या यापूर्वी सादर केलेल्या विविध अहवालांद्वारे वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या असूनही त्यामध्ये शासनाकडून आश्वासनांची पूर्तता करण्यामध्ये फारशी सुधारणा झाल्याचे समितीला आढळून येत नाही. प्रलंबित आश्वासने विचारात घेता ज्या आश्वासनामध्ये शासन स्तरावर कार्यवाही करणे, त्याची पूर्तता करणे सहज शक्य आहे अशी आश्वासने देखील शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उदासीनतेच्या धोरणामुळे विधानमंडळास सादर करण्यात कमालीचा विलंब होत आहे. ज्या आश्वासनांसंदर्भात विषय न्यायालयाच्या अधिकार कक्षेत आहेत अशा आश्वासनांसंदर्भात विलंब होत असल्यास ती बाब समजण्यासारखी आहे. तथापि, जी आश्वासने शासनाच्या स्तरावर वेळीच निपटारा करणे शक्य असतात अशी आश्वासने वेळेत पाठविण्यामध्ये जी दिरंगाई शासनाकडून दाखविली जाते ती अक्षम्य आहे असे समितीचे मत आहे. यासाठी समितीला संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक वाटते, कारण विलंबाने येणाऱ्या आश्वासनांमुळे सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध संसदीय आयुधांवर मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या अभिवचन अथवा आश्वासनांची वेळीच पूर्तता झाली नसेल तर सभागृहात जे सन्माननीय सदस्य राज्यातील सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाचे असलेले विषय उपस्थित करतात, ज्या बाबींसंदर्भात शासनाच्या विविध योजनोच्या अंमलबजावणीबाबत उहापोह केला जातो त्यात सुधारणा अथवा आणखी काही बदल करण्याची मागणी विविध संसदीय आयुधांमार्फत सभागृहात केली जाते व अशी मागणी मा.मंत्री महोदयांच्या माध्यमातून आश्वासनांच्या रुपाने सभागृहात पूर्तता झाल्यानंतरच सदरच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून संबंधित संसदीय आयुध तेवढयापुरते सभागृहात थांबविले जाते. याचा अर्थ असा आहे की, जे आश्वासन सभागृहात दिले जाते त्यावर शासनाने सर्वंकष कार्यवाही करुन त्याचा पूर्तता अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवणे अपेक्षित आहे. तद्वतच विधानसभेच्या या समितीकडे सदरच्या आश्वासनपूर्ततेचा परिपूर्ण अहवाल पाठविणे आवश्यक आहे. **तथापि अधिकाऱ्यांद्वारा या बाबींसंदर्भात अक्षम्य विलंब केला जात असल्यामुळे याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित करुन त्यासंदर्भात शासनाने कडक धोरण आखून सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता ही कोणत्याही परिस्थितीमध्ये ९० दिवसांच्या आत होणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणात न्यायालयीन अडथळे आहेत अथवा पूर्ततेबाबत काही अडचणी आहेत अशा बाबीदेखील शासनाने समितीच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. म्हणून यासाठी शासनाने एक सर्वंकष निर्णय घेऊन या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत संबंधित**

विभागाचे उप सचिव तथा सह सचिव यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन आश्वासन पूर्ततेसंदर्भात जाणीवपूर्वक दिरंगाई झाल्यास अशा अधिकाऱ्यांविरुध्द ठोस कारवाई करण्यासंदर्भात

निर्णय घेण्यात यावा. तसेच दर तीन महिन्याला संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांनी म्हणजेच सचिव / प्रधान सचिव यांनी त्यांच्या विभागाच्या संबंधित उप सचिव / सह सचिव यांचेसमवेत आश्वासनांच्या पूर्ततेबाबतच्या आढावा बैठका घेऊन मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासने / अभिवचने संदर्भात जी आश्वासने / अभिवचने सहज पूर्ण करणे शक्य आहे, अशा बाबतीत त्वरेने निर्णय घेऊन त्याबाबतचे विवरणपत्र संसदीय कार्य विभागामार्फत सभागृहाला पाठविण्याची कार्यवाही तत्परतेने व त्वरेने करावी तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सन २०१४ च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनात शासनाने दिलेल्या आश्वासनांपैकी प्रलंबित असलेल्या ८२२ आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली. याच ८२२ आश्वासनांपैकी समितीने ३८२ आश्वासनांचे वाचन करुन त्यावर निर्णय घेतला. १३३ आश्वासने समितीच्या विचारविनिमयासाठी (वाचनासाठी) प्रलंबित आहे. ९७ आश्वासने साक्षीसाठी प्रलंबित आहेत. आणि सुमारे २१० आश्वासने विभागाकडे प्रलंबित आहेत. शासनाने केलेल्या या कार्यवाहीबद्दल समिती समाधान व्यक्त करते.

मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनावर केलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर विलंबाने ठेवणे ही एक मोठी समस्या आहे. यात संसदीय कार्य विभागाने संबंधित विभागाशी संपर्क ठेऊन कोणत्याही परिस्थितीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणारी विवरणपत्रे विहित मुदतीत सभागृहासमोर ठेवणे आवश्यक आहे. **सदरची विवरणपत्रे विलंबाने पटलावर ठेवल्यामुळे संबंधित आश्वासने उक्त संसदीय आयुधातील विषय कालबाह्य**

झाल्याने विचारात घेणे समितीला शक्य होत नाही. परिणामी समितीच्या कामकाजात व्यत्यय निर्माण होतो. याबाबीसंदर्भात देखील शासनाने कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे.

संसदीय लोकशाही प्रक्रियेमध्ये सभागृहात देण्यात येणाऱ्या आश्वासनांना अनन्य साधारण महत्व आहे. मा.सदस्यांना सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या विषयावर चर्चा उपस्थित करुन संबंधित मंत्री महोदयांना त्यावर लगेच कार्यवाही करणे शक्य होत नसल्याने काही विषयाच्या बाबतीत आश्वासने दिली जातात. अशा आश्वासनांची पूर्तता सुदृढ संसदीय लोकशाहीसाठी अत्यंत आवश्यक आहे. कारण या आश्वासनांचा विविध योजनांच्या माध्यमातून जनतेवर प्रभाव पडत असतो आणि सदरच्या आश्वासनांची वेळीच पूर्तता झाल्यास जनतेमध्ये त्याचा सकारात्मक प्रतिसाद दिसून येतो. तथापि, वर्षानुवर्षे आश्वासनांची पूर्तता न झाल्यास जनतेचा शासन व्यवस्थेवरील विश्वास उडून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारतीय संविधानात विधानमंडळाच्या दोन अधिवेशनामधील कालावधी हा सहा महिन्यांपेक्षा जास्त असू नये अशी तरतूद आहे. या तरतूदीस अनुसरुन आपल्या राज्यातील राज्य विधानमंडळाची वर्षातून कमीत कमी तीन अधिवेशने होत असतात. ज्याला आपण उन्हाळी (अर्थसंकल्पीय), पावसाळी आणि हिवाळी अधिवेशने असे संबोधतो. म्हणूनच सभागृहात देण्यात येणाऱ्या प्रत्येक आश्वासनांच्या पूर्ततेचा कालावधी हा ९० दिवसांचा ठेवण्यात आला आहे. या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांची / अभिवचनाची पूर्तता ज्या अधिवेशनात दिली त्याच्या पुढच्या अधिवेशनात त्याची पूर्तता व्हावी हा उद्देश आहे. शासनाच्या विविध योजना राबविताना अशा

आश्वासनाची पूर्तता करताना शासनाच्या संबंधित विभागास पुरेसा वेळ मिळावा ही या मागील भूमिका आहे. अशा परिस्थितीमध्ये शासनाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांचे कर्तव्य असते की, **सभागृहात मंत्री महोदयाने आश्वासन दिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत आश्वासीत केलेली आश्वासने प्रस्तावित करुन त्यावर निर्णय घेऊन त्यानंतर येणाऱ्या लगतच्या अधिवेशनात आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी. विधानसभेच्या नियमानुसार आश्वासनांच्या पुर्ततेबाबत शासनास ९० दिवस इतक्या कालावधीची मर्यादा घालुन दिली आहे. सदर मर्यादेचे उल्लंघन कोणत्याही परिस्थितीत होता कामा नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केल्यास बहुतांश आश्वासनांची पूर्तता ही वेळेत किंबहूना वेळेच्या आधीदेखील होऊ शकते असे समितीचे ठाम मत आहे. सबब, आश्वासनांचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर विविध कालावधीत ठेवण्यासाठी शासनाने कडक धोरण आखावे. आश्वासनाची पूर्तता जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सरपणे विलंबाने करणाऱ्या संबंधित विभागाच्या उप सचिव/ सह सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन उक्त अधिकाऱ्यानी त्यांच्या कार्यकाळात त्यासंदर्भात नस्ती प्रस्तावीत करुन आश्वासन पूर्ततेचा पाठपुरावा करुन व तसे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाने सर्वंकष निर्णय घेऊन यासंदर्भात तातडीने परिपत्रक निर्गमित करावे व त्याबाबतचा अहवाल समितीला १ महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

सन १९९१ ते सन २०१८ या कालावधीतील एकूण आश्वासनांची संख्या ४७२५२ इतके आहे. त्यापैकी आतापर्यंत शासनाने ४२९६२ इतके आश्वासने निकाली काढली आहेत आणि प्रलंबित आश्वासनांची संख्या ४२९० इतकी आहे.

वरीलप्रमाणे प्रलंबित आश्वासनांची संख्या विचारात घेता फार मोठ्या प्रमाणावर आहे. सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणाऱ्या आश्वासनांची संसदीय कार्य विभागाकडून विविध विभागाद्वारे पाठविलेली आश्वासने एकत्रित करुन त्या सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात. अशा आश्वासनांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. त्यातील वेगवेगळ्या विभागाकडून संसदीय कार्य विभागाकडे पाठविण्यात आलेली आश्वासने याचे एकत्रित संकलन करुन त्याचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवले जाते. अशा संकलित केलेल्या आश्वासनांच्या विवरणाच्या प्रती अहवालाच्या माध्यमातून विधानमंडळाला सादर कराव्या लागतात. म्हणून विभागाने आश्वासनांची पूर्तता संसदीय

कार्य विभागाकडे करताना विवरणपत्रे "सॉफ्ट कॉपी" मध्ये घेऊन संसदीय कार्य विभागाकडे सादर करावी व संसदीय कार्य विभागाने अशा एकत्रित जमा झालेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता एकत्रित "सॉफ्ट कॉपी" मध्ये घेऊन ती विधानमंडळाकडे सादर करावी व अशा एकत्रित केलेल्या विवरणपत्राची माहिती **शासनामार्फत वेळोवळी पटलावर ठेवण्यात येणाऱ्या वर्षनिहाय व प्रत्येक अधिवेशननिहाय आश्वासनांबाबतच्या पूर्ततेबाबतची कार्यवाही विवरणपत्रासह सादर करावी. आश्वासनांच्या पूर्ततेबाबत मंत्रालयीन विभागाकडून समितीपुढे ठेवण्यासाठी पाठविण्यात येणाऱ्या विवरणपत्रात आश्वासनांचे विषय, मंत्री/ राज्यमंत्री महोदयांकडून सभागृहात देण्यात आलेले आश्वासने व करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा विभागाने केलेला उल्लेख यामध्ये बऱ्याच वेळेला विसंगती व तफावत आढळून येत असते. आश्वासनांचा विषय व त्याच्या पूर्ततेबाबतदेखील तफावत दिसून येत असते. याचाच अर्थ संबंधित अधिकारी हे वेळ मारुन नेण्यासाठी**

समितीपुढे हलगर्जीपणाने आश्वासनांची पूर्तता करीत असतात. आश्वासनांची पूर्तता ही विषयाच्या अनुषंगाने सुसंगत व परिपूर्ण असणे आवश्यक आहे. समितीच्या बैठकीत पहिल्या वाचनाच्या वेळी आढळून येणाऱ्या त्रुटींबाबत समिती गांभीर्याने घेत असून यापूढील काळात समितीसमोर ठेवण्यात येणाऱ्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबतची विवरणपत्रे ही कोणत्याही परिस्थितीत मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांशी सुसंगत व आश्वासनांच्या कक्षेत असल्याबाबत खात्री करुनच समितीकडे परिसृत करावीत व यासंदर्भात शासनाने सर्वकष परिपत्रक त्वरेने निर्गमित करुन यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

विशेष शिफारस

समितीस असेही निदर्शनास आले की, विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी संबंधित विभागीय सचिव / प्रधान सचिव अनेकदा या ना त्या कारणावरुन समितीसमोर साक्ष देण्यास अनुपस्थित असतात किंवा उपलब्ध होत नाहीत. त्यांच्या अनुपस्थित त्यांच्या ऐवजी संबंधित विभागाचे सह सचिव / उप सचिव (दर्जाचे अधिकारी) / अवर सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांना साक्षीसाठी हजर राहण्यासाठी सांगितले जाते. असे अधिकारी समितीसमोर साक्ष देत असताना पूर्णपणे माहिती घेऊन न येणे, समितीसमोर यथायोग्य उत्तर देत नसल्याने शासनाच्या धोरणात्मक निर्णयाची माहिती देण्यास असमर्थ असणे, समितीचे कामकाज त्याच्याकडून अपेक्षित असे कामकाज होत नसल्यामुळे प्रलंबित राहणे, चुकीची माहिती समितीसमोर सादर करणे, इत्यादी बाबी आढळून आल्या आहेत. त्यामुळे अनेकवेळा समितीला निर्णयाविना बैठक पुढे ढकलावी लागते. त्यामुळे समितीच्या वेळेचा अपव्यय होत असून समितीला पुढील संबंधित विषयावर वेळीच निर्णय घेणे शक्य होत नाही, याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.

यापुर्वीही अनेकवेळा शासनाच्या अनेक विभागाच्या संबंधित सचिवांनी समितीसमोर साक्षीसाठी उपलब्ध होऊ शकत नाही असे कळविले आहे. या संदर्भात मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना विधानमंडळाच्या समित्यांनी कठोर शब्दात समज दिली आहे असे असताना देखील संबंधित विभागाच्या सचिवांद्वारे याबाबत विधानमंडळ समित्यांच्या निदेशाचे पालन केले जात नाही. त्यामुळे शासनाच्या संबंधित अधिकाऱ्याच्या या भूमिकेचे समिती कठोर शब्दात नापसंती व्यक्त करते. कारण संसदीय लोकशाहीमध्ये समित्यांचे अनन्य साधारण महत्व लक्षात घेता राज्य शासनाचे अधिकारी समितीच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास बांधिल असताना त्यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीच्या कामकाजासंदर्भात यथायोग्य उत्तरे देऊन समितीच्या कामकाजात सहकार्य करणे आवश्यक आहे.

समिती समोर अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या विभागाचे सचिव, प्रधान सचिव अनुपस्थित राहणार असतील तर समितीला कमीत कमी तीन दिवस अगोदर / पत्र गेल्याबरोबर देखील मा.समिती प्रमुखांना अथवा समितीच्या सचिवांना कळविणे आवश्यक असते. परंतू याची सर्व संबंधित विभाग दखल सुध्दा घेत नाहीत. ही बाब

देखील तेवढीच गंभीर आहे. जर समितीच्या कामकाजात काही अपरिहार्य कारणामुळे संबंधित विभागाचे प्रधान सचिव / सचिव उपस्थित राहू शकत नसतील तर त्यांनी तसे समितीला कळविणे आवश्यक आहे. तथापि, बहुतांश अधिकारी बैठकीच्या ऐनवेळी समितीस कळवून त्यांचेऐवजी त्यांच्या अधिनस्त असणाऱ्या अधिकाऱ्यांना (सह सचिव/उप सचिव) समिती समोर उपस्थित राहण्यास व त्यांची अनुपस्थिती मान्य करण्याची विनंती केली जाते. त्यामुळे समितीला ऐनवेळी बैठक स्थगीत करावी लागते. अशाने समितीपुढील प्रलंबित कामांची संख्या वाढते. म्हणून हे टाळण्यासाठी विभागाच्या प्रधान सचिव / सचिव यांनी बैठकीस उपस्थित राहणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच समितीच्या बैठकीत आश्वासीत केलेली माहिती विहित वेळेत न देणे आणि समितीसमोर समाधानकारक उत्तरे न देता माहिती सादर केली जाईल असे आश्वासीत केले जाते. यावरुन संबंधित विभागाचे अधिकारी हे समितीसमोर येताना संबंधित आश्वासनांची परिपूर्ण माहिती घेऊन उपस्थित राहण्याबाबत शासनाच्या मुख्य सचिवांनी सर्व विभागांना कडक शब्दात निदेश द्यावेत अशी समितीची शिफारस आहे.

आश्वासन क्र. ३५७

विधानसभेच्या सन २०१४ च्या चौथ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ३५७ बाबत दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत "सन २०१४-२०१५ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागणी" या विषयावरील झालेल्या चर्चेत मा.मंत्री महोदयांनी "महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती थोडीशी जरी सुधारली तरी अनुकंपा तत्वावरील भरतीबाबत नक्की विचार करण्यात येईल असा मी शब्द देतो" असे आश्वासन दिले होते. त्याचे वाचन करण्यात आले त्यावेळी विभागाने सदरहू आश्वासन पुर्तीबाबत "शा.नि. सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र.३४/आठ, दिनांक २/०५/२०१४ नुसार वर्ग"क" व वर्ग "ड" मधील मंजूर पदांपैकी दरवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या १० % प्रमाणात अनुकंपा तत्वावर पदभरती अनुज्ञेय आहे.

अकोला महानगरपालिकेत सध्या अनुकंपा तत्वावरील भरतीसाठी ३८ अनुकंपाधारक पात्र आहेत. अकोला महानगरपालिकेचा सध्याचा प्राप्त होणारा एकूण महसूल रु. १०५.६९ कोटी इतका असून, यापैकी वेतनासाठी रु.५८.६४ कोटी एवढा वार्षीक खर्च आहे. अकोला महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ५५.४८ % इतका असून तो शासनाने ठरवून दिलेल्या (३५%) मर्यादेपेक्षा जास्त आहे. अकोला महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांचे फेरमूल्यांकन सन २००२-२००३ मध्ये करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत फेरमुल्यांकन करण्याची कार्यवाही सुरु आहे. तो पूर्ण झाल्यानंतर अकोला महानगरपालिकेच्या उत्पन्नात निश्चित भरीव वाढ होणार आहे.

सन २०१६-१७ मध्ये रिक्त होणाऱ्या पदांच्या १०% प्रमाणे पात्र ३८ वारसदारांमधून २४ वारसदारांचा टप्प्याटप्प्याने समावेश करण्याची व उर्वरित १४ अनुकंपा धारकांना महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचे प्रयोजन आहे. असे आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

या कार्यवाहीच्या अनुषंगाने समितीने महापालिकेचे उत्पन्न कमी असताना आणि कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी पुरेसा पगार नसताना महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार ३८ अनुकंपाधारक अनुकंपा तत्वावरील कसे काय पात्र ठरतात अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सन २०१६-२०१७ च्या प्रतिक्षा यादीतील कोणालाही नियुक्ती दिलेली नसून अकोला महानगरपालिकेचे उत्पन्न कमी असल्यामुळे आर्थिक परिस्थितीही हलाखीची आहे. त्यामुळे महापालिकेची वसुलीही कमी झाली असून कर्मचाऱ्यांचे पगार विशेष अनुदानातून होत आहे अशी समितीला माहिती दिली. समितीने यावर महानागरपालिकेने पूर्ण भरती

बंद केलेली आहे ते योग्य नाही तसेच सन २००२ मध्ये जी अवास्तव भरती केली गेली याबाबत नाराजी व्यक्त केली.

या संपूर्ण प्रकरणाचा विचार करता महानगरपालिकेच्या उत्पन्नातून आस्थापनावर ५५.४८% इतका खर्च होत असल्याने महानगरपालिकेस विकासात्मक कामाकडे तसेच नोकर भरतीकडे लक्ष देता येत नाही. महानगरपालिकेने आपल्या उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये वाढ केल्यास महानगपालिकेचा आस्थापना खर्च कमी होण्यास मदत होईल. यासाठी मालमत्तांचे फेरमूल्यांकन करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांची भरती करताना अनुकंपा तत्वावर भरतीचा असणाऱ्या अनुशेषास प्राधान्य देऊन नंतर इतर भरती करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

आश्वासन क्र. ३५९

विधानसभेचे सन २०१४ च्या चौथ्या अधिवेशनातील आश्वासन **क्र. ३५९** बाबत समितीने २१ ऑगस्ट, २०१८ रोजी बैठकीत घेतले असता "उत्तर महाराष्ट्रासह अन्य ठिकाणी वादळी पाऊस व गारपिटीने शेतकरी उद्ध्वस्त होणे" या विषयावर मा. मंत्री महोदयांनी "राज्य सरकारने या आच्छादनाच्या फ्रेमिंगसंबंधी किती अनुदान द्यावयाचे याबाबत राज्य सरकार विचार करील" असे आश्वासन दिले होते. याबाबत करण्यात आलेली कार्यवाही ही एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामधून गारपिट विरोधक जाळी (Anti Hailnet) करीता रु. ३५/- प्रती चौ.मी. या मापदंडानुसार ५०% अनुदान, ५००० चौ.मी. मर्यादेपर्यंत देय आहे.

तथापी, फळबागांवर, प्लॅस्टिक आच्छादन टाकल्यास त्यांचे अवकाळी पाऊस/गारपीट यापासून संरक्षण होवू शकते. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आहेत. त्यामध्ये प्लास्टीक आच्छादन या घटकाचा समावेश नाही. प्लास्टीक आच्छादन या घटकाकरीता आवश्यक मापदंड व अनुदानाची टक्केवारी निश्चित करुन, सदर घटकाचा समावेश राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालय, (फलोत्पादन विभाग) यांस दि.०५/०२/२०१६ च्या पत्रान्वये सादर करण्यात आलेला आहे.

याबाबत आश्वासन पूर्तीसाठी करण्यात आलेली कार्यवाही ही विभागाने केलेली आहे. याबाबत बैठकीत चर्चा

झाल्याप्रमाणे नाशिक येथे जी गारपीट विरोधक जाळी (ॲन्टी हेल्नेट) बसविण्यात आली आहे. याजाळीसाठी किती लोकांनी अनुदान घेतलेले आहे व या योजनेचा लाभ किती शेतकरी घेत नाहीत अशी विचारणा केली असता सदर जाळी ही वादळामध्ये टिकत नाही त्यामुळे द्राक्ष बागा उद्ध्वस्त होत आहेत अशी समितीला माहिती देण्यात आली आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने हेक्टरी २५ हजार रुपये मदतही दिलेली आहे. सबब (ॲन्टी हेल्नेट) गारपीट विरोधक जाळी बसविण्यासाठी एखाद्या जिल्ह्याची निवड करुन याबाबत त्याची संपूर्ण गुणवत्ता तपासल्यानंतरच ही जाळी शेतकऱ्यांना देण्यात यावी. म्हणून समिती अशी शिफारस करते की, **गारपीट विरोधक जाळी (ॲन्टी हेल्नेट) द्राक्ष बागांच्या ट्रायलसाठी एखाद्या जिल्हाची निवड करावी व ही जाळी प्लॅस्टीक हार्ड क्लोटेड असावी जेणेकरुन सुर्यप्रकाश देखील परावृत्तीत होऊन शेतकऱ्यांच्या पीकावर कोणताही दुष्परिणाम होणार नाही यासाठी शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान देण्यात यावे अशी शासनाने केंद्र शासनाला शिफारस करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यात सादर करावा.**